पोलीस स्टेशन, रामनगर जि. चंद्रपूर

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** रामनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0786 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/09/2025 02:02

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 28/09/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/09/2025
**Time From (वेळेपासून):** 09:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/09/2025 **Time (वेळ):** 00:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/09/2025 02:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रशासकिय भवन ,उपजिल्हाधिकारी पुर्नवसन कार, चंद्रपूर ,चंद्रपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन, रामनगर
जि. चंद्रपूर



6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. संतोष सज्जन देशकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पठाणपुरा वार्ड, मिलींदनगर,चंद्रपूर ,चंद्रपूर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पठाणपुरा वार्ड, मिलींदनगर,चंद्रपूर ,चंद्रपूर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7066898958

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. नरेंद विठोबाजी खांडेकर | | | 1. स्व्हिल लाईन ,जिल्हा स्टेडिअम जवळ चंद्रपूर,विकास केंद्राच्या मागे ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान | फाईल्स, कागदपत्र | आलोसे यांचेकडुन तक्रारदाराचे | 0.00 |

पोलीस स्टेशन, रामनगर
जि. चंद्रपूर



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | रोखे | | तक्रारीसंबंधी कागदपत्रे जप्त करणय्ात आले. | |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आलोसे यांचे कडुन सापळा कार्यवाही दरम्यान जप्त करण्यात आलेली ा लाच रक्कम | 30,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | आलोसे यांचे घरझडतीत मिळालेली रक्कम | 189,508.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | मेमोरी कार्ड | 0.00 |
| 5 | इतर | संकीर्ण/विविध | सापळी कार्यवाहीचे मेमोरी कार्ड | 0.00 |
| 6 | इतर | संकीर्ण/विविध | सापळा कार्यवाही दरम्यानचे व्हिडीओ रेकॉर्डिग असलेले मेमोरी कार्ड | 0.00 |
| 7 | इतर | संकीर्ण/विविध | ॲन्थ्रॉसिन पावडचे अंश असलेले आरोपीचा लोवरपॅन्ट | 0.00 |
| 8 | इतर | संकीर्ण/विविध | घरझडतीचे मेमोरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

219,508.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:-28/09/2025 ठिकाण:-चंद्रपूर

मी श्री. संतोष सज्जन देशकर, वय 61 वर्ष, व्यवसाय - शेती, रा. पठाणपुरा वार्ड, मिलींदनगर, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर येथे परिवारासह राहत असून माझी आर्इ स्वर्गीय कमलाबार्इ सज्जन देशकर हिचा भाऊ श्री. आबाजी विश्वनाथ घागरगुंडे (मामा) व लहानाबार्इ विश्वनाथ घागुरगुंडे (आजी) यांचे नावे मौजा चारगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथील घर क्र. 63, 64, 65 आराजी 19.50, 43.75 चौ.मि. व खुली जागा 128.44 चौ.मि. ही मालमत्ता औष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर येथे गेलेली असल्याने सदर मालमत्तेवर सन 2014 मध्ये माझी मुलगी कु. स्वाती संतोष देशकर हिचे नांव प्रकल्पग्रस्त व्यक्ती म्हणुन नामनिर्देशीत केले होते. महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. मुंबर्इ यांचेकडून सन 2022 मध्ये 'कनिष्ठ अभियंता' या पदाकरीता जाहीरात निघालेली होती. त्यानुसार माझी मुलगी कु. स्वाती संतोष देशकर ही परिक्षा देवून प्रकल्पग्रस्त या राखीव जागेतून तिची निवड झालेली होती. त्यानंतर दि. 08/07/2025 रोजी संध्याकाळी 5 वा. दरम्यान पुर्नवसन विभागाचे अधिकारी हे माझे राहते घर पठाणपूरा वार्ड चंद्रपूर येथील घरी आले व मला म्हणाले की, ''आपल्या मुलीचे महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. मुंबर्इ येथे 'कनिष्ठ अभीयंता' या पदावर प्रकल्पग्रस्त कोटयातून निवड झालेली असुन भरतीवेळी सादर केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची पुर्नपडताळणी करण्याकरीता आमचे कार्यालयास पत्र प्राप्त झाले आहे. तरी आपण आपल्या मुलगी स्वाती देशकर हिचेसह प्रशासकीय भवन चंद्रपूर येथील पुर्नवसन विभागात येवून भेटा.'' असे म्हणाले. त्यानंतर मी माझे मुलगी स्वाती हिचेसह प्रशासकीय भवन चंद्रपूर येथील पुर्नवसन विभागात जावून सहायक महसुल अधिकारी श्री. नरेंद्र खांडेकर साहेबांना भेटलो. तेव्हा सहायक महसुल अधिकारी श्री. नरेंद्र खांडेकर साहेब यांनी सांगीतले की, ''तुमच्या मुलीच्या नोकरीसाठी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची पुर्नपडताळणी करून महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्यादीत मुंबर्इ यांना तुमच्या बाजुने अहवाल पाठवावयाचे असल्यास माझेकरीता 2 लाख रूपये

दयावे लागेल, तरच मी तुमच्या मुलीच्या बाजुने अहवाल पाठवितो. तुम्ही जर मला पैसे दिले नाहीतर, मी निगेटीव्ह अहवाल महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई यांना पाठवेल, त्यामुळे तुमच्या मुलीला नौकरीवर ते घेणार नाही.'' असे म्हणाले. त्यावर मी ''माझेजवळ एवढे पैसे नाही आहे.'' असे म्हणालो असता श्री. खांडेकर साहेब म्हणाले की, ''तुमची मुलगी नौकरीवर लागताच तिला दरमहा 1 लाख रूपये पगार मिळेल, त्यामुळे ही रक्कम जास्त नाही आहे'' असे म्हणाले. तरीसुध्दा मी त्यांना नकार दिला असता त्यांनी मला ''सध्या 1 लाख रूपये दया व ज्यावेळेस मी अहवाल तयार करून पाठवेल त्यावेळेस 30 हजार रूपये दया.'' असे म्हणाले. त्यावर मी नाइलाजास्तव त्यांना होकार देवून सहायक महसुल अधिकारी श्री. नरेंद्र खांडेकर साहेबांना त्यांचे कार्यालयात दि. 09/07/2025 रोजी दुपारी 03:00 वा. दरम्यान माझे बचतीतील 1 लाख रूपये नेवून दिले.त्यानंतर मी अधेमध्ये सहायक महसुल अधिकारी श्री. नरेंद्र खांडेकर साहेबांना फोन करून अहवाल पाठविले किंवा नाही याबाबत विचारणा करीत होतो. दिनांक 26/09/2025 रोजी संध्याकाळी 04 वा. व 05 वा. दरम्यान माझे मुलाचे महाकाली मंदीर चंद्रपूर परिसरात असलेल्या भांडी विक्री दुकानात बसुन असतांना मी माझे मोबाईल क्र. 7066898958 यावरून सहा. महसुल अधिकारी श्री. खांडेकर साहेबांना त्यांचे मोबाईल क्र. 9767170883 यावर फोन करून मा÷या मुलीच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राचे पुर्नपडताळणी अहवाल पाठविले किंवा कसे याबाबत विचारणा केली असता श्री. खांडेकर साहेब यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलावीले. त्यावरून मी त्यांना भेटण्यास त्यांचे प्रशासकीय भवन चंद्रपूर येथील पुर्नवसन कार्यालयात अंदाजे संध्याकाळी 5 वाजता दरम्यान गेलो असता त्यांनी मला ''तुमच्या मुलीच्या प्रमाणपत्रात त्रुटया दिसुन येत आहे, त्या बरोबर करून फॅक्स करावे लागतील. त्याकरीता मला आता 30,000/- रू. घेवून या'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ''आता शेतीचे कामे सुरू आहेत, पैशाची अडचण आहे, तरी मी उदयाला पैशाची जुळवाजुळव करून आणुन देतो.'' असे म्हणालो.त्यानंतर दिनांक 27/09/2025 रोजी सहायक महसुल अधिकारी श्री. नरेंद्र खांडेकर यांनी माझे मोबाईलवर 01:45 वा. व 03:39 वा. दरम्यान फोन करून मला ''तुम्ही सांगीतल्याप्रमाणे कार्यालयात पैसे आणुन दिले नाही'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ''आज खूप पाऊस सुरू असुन माझे येणे होणार नाही'' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'ठिक आहे, उदयाला 11:00 वा. दरम्यान मला फोन करून कार्यालयात पैसे आणुन दया'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना होकार देवून फोन ठेवून दिला.मला गैरअर्जदार श्री. नरेंद विठोबाजी खांडेकर, सहायक महसुल अधिकारी, उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन) कार्यालय चंद्रपूर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी काल दिनांक 27/09/2025 रोजी संध्याकाळी अंदाजे 04:00 वा. दरम्यान लाच लुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे आलो व तेव्हा कार्यालयात हजर असलेल्या कर्मचारी यांना तक्रार दयावयाची असल्याबाबत सांगीतले असता त्यांनी मॅडम यांना फोन करून तक्रारदार आले असल्याचे सांगीतले. तेव्हा त्यांचे फोनवरून मॅडम माझेशी बोलून मी बाहेर असल्याने येण्यास उशीर होणार आहे, मी निघाले की तुम्हाला फोन करतो असे म्हणुन माझा मोबाईल क्रमांक घेतला. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मला संध्याकाळी 05:00 वा. दरम्यान फोन करून येत असल्याबाबत कळविले असता मी त्यांना पाऊस सुरू आहे मी तक्रारीसंबंधी उदया सकाळी 09:00 वा. कार्यालयात येवुन भेटतो असे सांगीतले होते. त्यावरून आज दिनांक 28/09/2025 रोजी सकाळी अंदाजे 09/00 वा. दरम्यान लाच लुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन श्रीमती भोसले मॅडम यांना भेटून मला लाच मागणी संबंधाने तक्रार द्यायची असल्याचे सांगितले असता त्यांनी मला लेखी तक्रार देण्यास सांगुन गैरअर्जदारांनी मागणी केलेली लाच रक्कम जमा करण्यास सांगितले. त्यावरून मी त्यांना माझ्या मुलीच्या नोकरीकरीता प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची पुर्नपडताळणी करून अहवाल महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्या. मुंबई यांना पाठविण्याच्या कामाकरीता 30,000/- रू. लाचेची मागणी केल्या प्रकरणी कारवाई होण्याकरीता श्री. नरेंद विठोबाजी खांडेकर, सहायक महसुल अधिकारी, उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन) कार्यालय, चंद्रपूर यांचे विरूध्द मी माझी लेखी तक्रार दिली.यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी सदर कार्यवाही करीता लोकसेवक पंचाची आवश्यकता असल्याचे सांगून 09/50 वा. दरम्यान त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या एका कर्मचाऱ्यांचे हस्ते मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय चंद्रपूर यांचे नावे दोन पंच मिळणेबाबत पत्र तयार करून रवाना केले. त्यांनतर अदांजे 10/20 वा. दरम्यान सदर कर्मचारी दोन पंचासह कार्यालयात परत आले. त्या पंचाना पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी त्यांची नावे विचारून माझी त्यांचेशी व कार्यालयीन कर्मचाऱ्याशी ओळख करुन दिली. त्यांनतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना तसेच कार्यालयीन स्टॉफ यांना मी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन मा÷या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर मी सही करून दिलेल्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केली.त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण SONY कंपनीचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगून पोहवा/हिवराज

नेवारे यांचे हस्ते व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी मला सापळा कारवाईकरीता रक्कम जमा करण्याकरीता सांगितले असता मी माझेकडील बचतीतील 30,000/- रू. ज्यामध्ये (500/- दराच्या 60 चलनी नोटा) सापळा कारवाईसाठी दिल्या. सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अॅंथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व पोशि/प्रदिप ताडाम यांचे मार्फतीने एका कोऱ्या पांढऱ्या कागदावर अॅंथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या सर्व नोटांना अॅंथ्रॅसिन पावडर लावून सदर नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफाफा पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला.
त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांचे सुचनेवरून मी माझे तक्रारीसंबंधाने मुख्य व्यवस्थापक, महाराष्ट राज्य विज निर्मीती कंपनी मर्यादीत मुंबई यांचेकडून मा. उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांना दिलेली प्रत माहीतीस्तव मुलगी स्वाती देशकर हिचे नावाने असलेली छायांकित प्रत त्यांचेकडे सादर केली. सदर प्रतीवर मी, दोन्ही पंच व पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केलेली आहे. त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी मला गैरअर्जदार श्री. नरेंद्र खांडेकर, सहायक महसूल अधिकारी, उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कार्यालय चंद्रपूर हे कुठे भेटतील असे विचारले असता मी त्यांना सांगीतले की, गैरअर्जदार यांनी मला आज सकाळी 11:00 वा. दरम्यान फोन करून भेटण्यास बोलाविले असल्याचे सांगितले असता पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी वेळ व स्थान निश्चीत करणेकरीता माझे मोबाईल क्रमांकावरून गैरअर्जदाराचे मोबाईल क्रमांकावर फोन करून बोलणी करण्यात येणार असल्याबाबत सांगितले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या½-त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांनी मला सुचना दिल्या की, माझे मोबाईल क्रमांकावरून गैरअर्जदार श्री. नरेंद्र खांडेकर, सहायक महसूल अधिकारी यांचे मोबाईलवर फोन करून फोन स्पिकर मोडवर ठेवून प्रत्यक्ष येवून भेटण्याकरीता ठिकाण व वेळेबाबत विचारणा करण्याबाबत बोलणी करावी असे सांगीतले. त्यांनतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांचे सुचनेवरून पोहवा/हिवराज नेवारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन असल्याचे सांगुन मेमरी कार्ड व व्हाईस रेकार्डरमध्ये कोणतीही फाईल नसल्याची खात्री करून 11/15 वा. व्हॉईस रेकार्डींग सुरू करून मोबाईल फोनवर बोलणी करीत असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर मी माझे मोबाईल क्र. 7066898958 यावरून श्री. नरेंद खांडेकर, सहायक महसूल अधिकारी यांचे मोबाईल क्र. 9767170883 यावर 11/19 वा. फोन करून फोन स्पिकर मोडवर ठेवला. गैरअर्जदार नरेंद्र खांडेकर यांनी फोन उचल्यानंतर तक्रारदार यांनी ''खांडेकर साहेब नमस्कारजी, तर मी का म्हटलं का झालं का ते फॅक्स केलं का'' त्यावर गैरअर्जदार श्री खांडेकर यांनी ''नाही करायचं आहेनं, ये एकांदी वाजता'' असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी ''अच्छा ऑफिसला एक वाजता'' त्यावर गैरअर्जदार श्री. खांडेकर यांनी ''हो हो ए ए एक दीड वाजता या'' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी मोबाईल फोन कट केला. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व तक्रारदार यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर आमचे सूचनेवरून पोहवा/हिवराज नेवारे यांनी 11:21 वा. व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर पोउपअधी श्रीमती भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार पोहवा/हिवराज नेवारे यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर कार्यालयीन संगणकाला कनेक्ट करून पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत असलेली फाईल फॉरवर्ड करून ऐकली. गै.अ. सहायक महसुल अधिकारी श्री नरेंद्र खांडेकर यांनी मला प्रशासकीय भवन येथील उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन) कार्यालय चंद्रपूर येथे दुपारी 01/00 ते 01/30 वा. दरम्यान बोलावले (CCTNS प्रणाली मध्ये शब्दाची मर्यादा असल्यानेसदरची फिर्याद मुळ फिर्यादीमध्ये समाविष्ठ आहे )

पोलीस स्टेशन, ... जि. चंद्रपूर



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Asif Baktawar Sheikh(I (Inspector)) / pcmh86017 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
संतोष रामचंद्र देवाळकर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Asif Baktawar Sheikl
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pcmh86017

पोलीस स्टेशन, राजुरा जि.चंद्रपूर



**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)